बौद्धिक प्रगल्भता

सामाजिक जाणीव

मानसिक समृद्धी

शारीरिक कौशल्ये

नेतृत्वगुण विकास



अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।

'ईशावास्योपनिषद्'

घडो ज्ञानाचा उद्बोध।
भक्तिप्रेमाचा कल्लोळ ।।

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला पुणे

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला : महत्त्वाचे टप्पे

**१९६२... बुद्धिमान मुलांसाठी दोन तासांचे वर्ग ... प्रबोधशाळेद्वारे ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या पायाभरणीस प्रारंभ!**

संस्थापक
डॉ. वि.वि. तथा आप्पा पेंडसे
(१९१६-१९८३)



| | | |
|---|---|---|
| १९६९ | : | प्रशालेस प्रारंभ |
| १९७२ | : | प्रशालेची पहिली तुकडी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची शालान्त परीक्षा उत्तीर्ण |
| १९७३ | : | यावर्षी दुसरी व तिसरी तुकडी शालान्त परीक्षा एकत्र उत्तीर्ण झाली. विद्यमान संचालक आदरणीय वाच. गिरीशराव बापट दुसऱ्या तुकडीचे विद्यार्थी |
| १९७४ | : | अध्यापनात प्रकल्प पद्धतीचा समावेश |
| १९७५ | : | युवती प्रशालेस प्रारंभ, अभ्यासक्रमात गटकार्यांचा समावेश |
| १९७६ | : | केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची कायम संलग्न शाळा म्हणून मान्यता |
| १९७७ | : | संरचनेतील बदल :१०+२ या नव्या रचनेचा स्वीकार |
| १९८९ | : | गुणविकास योजनेस प्रारंभ - विविध कौशल्यांचा विकास करणाऱ्या योजनेचा इ.७वीच्या अभ्यासक्रमात समावेश बहुपुस्तकी अध्यापनास सुरुवात |
| १९९० | : | अभिव्यक्ती विकास योजना- विद्यार्थ्यांमध्ये कलाकौशल्यांबद्दल आवड वाढवण्यासाठीची योजना सुरू |
| १९९१ | : | अभ्यासक्रमात स्वयं-अध्ययन कौशल्यांचा समावेश |
| १९९४ | : | भविष्यवेध प्रकल्पांचा अभ्यासक्रमात समावेश |
| २००७ | : | अग्रणी योजना - नेतृत्वगुण विकसनाच्या योजनेचा नियमित अभ्यासक्रमात रचनाबद्धरीतीने समावेश |
| २०१० | : | इंग्रजी व गणित या विषयातील प्रभुत्वासाठी स्तरीय पद्धतीने अध्यापनास सुरुवात |
| २०१२ | : | शालेय व्यवस्थापनाचे संपूर्ण संगणकीकरण |

### ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची वैशिष्ट्ये

- ५०,००० पुस्तकांचे मुक्तद्वार ग्रंथालय - ध्वनिफिती, चित्रफिती, आंतरजाल सुविधेने सुसज्ज
- विज्ञान, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित विषयांसाठी स्वतंत्र मुक्तद्वार प्रयोगशाळा आणि दोन स्वतंत्र संगणक प्रयोगशाळा
- समाजशास्त्रे आणि कला-कौशल्यांसाठी स्वतंत्र दालने
- अभियांत्रिकी व अणुविद्युत विषयांतील मुक्त प्रकल्प करण्यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा
- प्रत्येक वर्गात आंतरजालाशी थेट जोडलेल्या बहुमाध्यम सुविधा, प्रत्येक अध्यापकासाठी आंतरजाल सुविधेसह स्वतंत्र संगणक
- २००० माजी विद्यार्थ्यांचा सशक्त संघ-प्रबोधिनीच्या नियमित कामात व विद्यार्थ्यांच्या विकसनात नियमित सहभाग
- ४५ पूर्णवेळ/अर्धवेळ अध्यापक आणि १५ अध्यापकेतर कर्मचाऱ्यांसह ६० जणांचा कार्यकारी संच
- मनुष्यघडणीचे अनेक उपक्रम एकाच छताखाली करीत असलेल्या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त ज्ञान प्रबोधिनी या संस्थेचे समृद्ध व प्रभारित वातावरण.

# शैक्षणिक उपक्रम

## बौद्धिक प्रगल्भता

स्वयंअध्ययन कौशल्ये
वाचन कौशल्ये
स्मरण कौशल्ये
विचार कौशल्ये
संवाद कौशल्ये
यांचे
शालेय व सहशालेय
उपक्रमांमधून प्रशिक्षण

## सामाजिक जाणीव

प्रकल्प भेटी
संस्था भेटी
अभ्यास दौरे
विस्तार कार्य
ग्रामीण शिबिरे
नागरी वस्ती-
-संस्कारवर्ग
गणेशोत्सव
मदत कार्ये

## मानसिक समृद्धी

चरित्रकथन, कथाकथन
इतिहास कथन, पद्ये–अभंग,
उपासना, प्रतिज्ञा–ग्रहण, बैठकी
विशेषदिन, जोडीकार्ये, गटकार्ये,
ग्रंथालय, वैचारिक कार्यक्रम,
अभिव्यक्ति विकसन,
छात्र प्रबोधन मासिक

## शारीरिक कौशल्ये

देह परिचय
दैनंदिन खेळ
व्यायाम, संचलन
स्पर्धा व सामने
क्रीडा शिबिरे
क्रीडा प्रात्यक्षिके
हस्तकौशल्ये
गिर्यारोहण
तालनृत्य


## नेतृत्वगुण विकास

नियोजन कौशल्य
निर्णय कौशल्य
व्यवस्थापन कौशल्य
संघटन कौशल्य
यांचे
गट–बैठकी, पथक पद्धती,
अग्रणी योजना, विस्तार कार्ये,
मार्गदर्शक दले इ.
द्वारे प्रशिक्षण


# बौद्धिक प्रगल्भता

## घडवू शतपैलू बुद्धीचे

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही बुद्धिमान मुलांसाठी चालविलेली शाळा आहे. परंतु ज्ञान प्रबोधिनीची बुद्धीची कल्पना शालेय विषयातील बुद्धिमत्ता इतकी मर्यादित नाही. बुद्धी बहुजिनसी आहे व तिचे अनेक पैलू आहेत. हे पैलू प्रत्येक व्यक्तीत कमी-अधिक प्रमाणात विकसित झालेले असतात व सध्याच्या रूढ शालेय अभ्यासक्रमात यांपैकी फारच थोड्या पैलूंना प्रकट होण्याची संधी मिळते. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीच्या अप्रकट क्षमता दाखविण्यास वाव मिळावा अशी भूमिका आहे.











## बहुपुस्तकी अध्यापन

शास्त्र व गणित हे विषय एखाद्या विशिष्ट पुस्तकाच्या साहाय्याने शिकविले पाहिजेत, असा आग्रह धरलेला नाही. उलट अध्यापकांनी व मुलांनी अनेक पाठ्यपुस्तके व संदर्भपुस्तके वाचावीत अशी अपेक्षा असते.







## विशेष अभिरुची गट

शालेय पाठ्यक्रमाच्या पलिकडेही विद्यार्थ्यांना अनेक विषयांत रस असतो. शाळेच्या चौकटीच्या बाहेर असणाऱ्या या विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न 'विशेष अभिरुची गटाच्या' निमित्ताने करत आहोत. ज्यांना एखाद्या विषयाची विशेष आवड आहे. अशी १० मुले एकत्र आल्यास या वर्गाची सुरवात करण्यात येते. शाळेपूर्वी १ तास हे वर्ग होतात.





## दृक्-श्राव्य माध्यमांचा वापर

वर्गातच उपलब्ध असणाऱ्या दृक्श्राव्य माध्यमांचा वापर मोठ्या वर्गांत अध्यापनासाठी केला जातो.
छोट्या वर्गांसाठी विशेष दृक्-श्राव्य साधने उपलब्ध आहेत. सर्व वर्गांत संगणक उपलब्ध असून तो आंतरजालाशी (इंटरनेट) जोडलेला आहे.

# बौद्धिक प्रगल्भता

## प्रभुत्व अध्ययन

इंग्रजी, गणित या विषयांसाठी आठ स्तर केले आहेत. एकूणात प्रत्येक विद्यार्थ्याने किमान सात स्तर पूर्ण करावेत अशी अपेक्षा असते.



$$\text{अध्ययन कार्यक्षमता} = \frac{\text{अध्ययनासाठी अपेक्षित वेळ}}{\text{अध्ययनासाठी लागलेला वेळ}}$$






किमान कौशल्य मिळविल्या-शिवाय पुढच्या स्तरात प्रवेश नाही व लवकर मिळविल्यास पुढच्या स्तरात लगेच प्रवेश अशी ही योजना आहे.

सर्व विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी लागणारा वेळ सारखा नसतो. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:च्या गतीने शिकावयास मिळाल्यास सर्वच विद्यार्थी प्रभुत्व मिळवू शकतात.

विविध प्रकारचे प्रकल्प करीत असताना विद्यार्थ्यांच्या विचार-कौशल्यांचा विकास होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ वी | संग्रहात्मक प्रकल्प | ६ वी | माहितीचा संग्रह |
| ७ वी | प्रतिकृति-प्रकल्प | ८ वी | अभिव्यक्ति प्रकल्प |
| ९ वी | संशोधनात्मक प्रकल्प | १० वी | भविष्यवेध प्रकल्प |










यातून विद्यार्थी माहिती मिळविण्याची, तिच्यावर प्रक्रिया करण्याची व
त्यातून निष्कर्ष काढण्याची कौशल्ये शिकतात.
त्याच्या जोडीनेच त्यांच्यातील वैज्ञानिक वृत्ती,
चिकित्सक वृत्ती, प्रतिभा व हस्त-कौशल्ये यांचा विकास होतो.

## प्रकल्प

# बौद्धिक प्रगल्भता

## बाह्य परीक्षा



विद्यार्थ्यांना बाह्य परीक्षांना बसण्यास परवानगी असते.
प्रशालेतून खालील परीक्षांना बसण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

- राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा
- ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ - संस्कृत परीक्षा
- शासकीय चित्रकला परीक्षा
- गणित प्रावीण्य परीक्षा

इतर परीक्षांसाठी मार्गदर्शनासाठीची व्यवस्था दरवर्षी शाळेतून होईलच असे नाही. तथापि, अनुमती दिली जाते.



इ.५ वी व इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच इ.१०वी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा या परीक्षांना विद्यार्थ्यांनी बसावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात येते व त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन वर्गही चालवण्यात येतात.



## विशेष मार्गदर्शन वर्ग

# सहाध्यायदिन - अभ्यास सहली



विद्यार्थ्यांच्या बुद्धीला खाद्य द्यायचे असेल तर त्यांना नवनवे अनुभव द्यावे लागतात. प्रशालेत वर्गाच्या चार भिंतींच्या आत होणाऱ्या शिक्षणाइतकेच वर्गाबाहेरच्या शिक्षणाला महत्त्व आहे.



कारखाने, संशोधन संस्था, विकास प्रकल्प, रुग्णालये यांसारखी आधुनिक तीर्थक्षेत्रे त्यांनी पाहायला हवीत. त्यांची योजना केली जाते.







बुद्धी 'करती' व्हावी यासाठी ही 'धडपड'. केवळ विचाराने, तर्काने अनेकवेळा बुद्धिमान व्यक्ती वेळ मारुन नेऊ शकतात. मात्र प्रत्यक्ष काम करताना बुद्धीस कारक कौशल्यांची गरज लागतेच. विचारातील उणीवा कुठे-कुठे भरुन काढाव्या लागतात, हे प्रत्यक्ष हाताने काम करताना लक्षात येते. द्विमितीय किंवा त्रिमितीय विचार करताना प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणींची जाणीव होते व प्रश्नांना प्रतिभाशाली उत्तरे मिळण्याची शक्यता निर्माण होते. कल्पक समस्या परिहार व 'स्वनिर्मिती' चा आनंद हे धडपडीचे फलित असते.



# 'धडपड' प्रयोगशाळा

# सामाजिक जाणीव

## मन विशाल समृद्ध बनावे

प्रबोधिनीतील बुद्धिकौशल्यांच्या विकासाइतकेच किंबहुना थोडे अधिकच महत्त्वाचे काम म्हणजे मनांची मशागत. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना अन्यायाची चीड आली पाहिजे आणि दीनदुबळ्यांच्या दु:खदर्शनाने त्यांचे मन हेलावून गेले पाहिजे. भावकोषाच्या समृद्धीसाठी प्रशालेत अनेक उपक्रमांतून असे वातावरण निर्माण केले जाते की त्यातून विद्यार्थ्यांची मने आपोआपच घडतात.

पुस्तकातल्या शब्दांपेक्षा हे अनुभव जास्त बोलके असतात.








भारतीय समाजाच्या परंपरांचा, सण-उत्सवांचा परिचय व्हावा म्हणून विद्यार्थी वारकऱ्यांबरोबर दिंडीत सहभागी होतात. बरची नृत्य करत गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतात. पुण्यातील सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीला दिशा देण्याचे काम प्रबोधिनीच्या पथकांनी केले आहे.

### पालखी-गणेशोत्सव





## तंबूतील शिबिरे

निसर्ग सान्निध्यात वास्तव्य, स्वावलंबी बनविणारा दिनक्रम, श्रमाची प्रतिष्ठा शिकविणारी श्रमकार्ये, डोळे उघडणारे परिसरातील ग्रामीण वास्तव, शेकोटीभोवती बसून गायलेली पद्ये अविस्मरणीय अनुभव देऊन जातात.











## ग्रामीण शिबिरे

विद्यार्थी वर्षातून काही दिवस तरी ग्रामीण भागात जाऊन तिथल्या परिस्थितीचा अनुभव घेतात.

## समाज दर्शन

## सामाजिक जाणीव

# मानसिक समृद्धी

## अभिव्यक्ति विकास


प्रत्येक विद्यार्थी काही उत्तम कलाकार होऊ शकणार नाही
पण प्रत्येक विद्यार्थ्याला कलेचा आस्वाद घेता आला पाहिजे.











- गायन
- वादन- सूरवाद्य
- वादन- तालवाद्य
- वक्तृत्वकला
- लेखनकला
- शिल्पकला
- चित्रकला
- नाट्यकला
- नृत्य कला



या तासिकांमधून विद्यार्थ्यांपर्यंत कलेची दृष्टी व कौशल्ये पोहोचवण्याचा प्रयत्न केला जातो.

इतिहास अध्यापनातून प्रेरणा जागरण हा एक महत्त्वाचा हेतू

५ वी    शिवरायांचे चरित्र

६ वी    मराठ्यांचा आणि राजपूतांचा इतिहास

७ वी    शिखांचा इतिहास







जागतिक इतिहासाचा अभ्यास सुरू करण्यापूर्वी या देशाच्या पराक्रमाचा इतिहास विद्यार्थ्यांच्या मनी ठसला जावा हा उद्देश. यासाठी प्रशालेने पुस्तकेही तयार केली आहेत.



## कथाकथनातून इतिहास शिक्षण

मानसिक समृद्धी

# मानसिक समृद्धी

## चिदानंदरूपी शिव मी शिव मी

"धर्मविचार आणि ईशचिंतन यांत सनातन्यांतील सनातनी व शास्त्रे आणि उद्योगविचार यांत आधुनिकांतील आधुनिक" असे ज्ञान प्रबोधिनीच्या भूमिकेचे वर्णन करता येईल. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या साऱ्या कर्तृत्वाला आध्यात्मिक बैठक असावी असा आग्रह येथे धरला जातो. विविध उपासनांद्वारे विद्यार्थ्यांना ईशचिंतनाचा मार्ग दाखविला जातो.





### उपासना

दर शनिवारी सकाळी विद्यार्थी पवित्र वातावरणात सामूहिक उपासना करतात. उपासनेच्या मध्यंतरात ध्यान करताना त्यांनी 'स्व' पासून ते राष्ट्रापर्यंत चिंतन करावे असे त्यांना सांगितले जाते. अशी उपासना त्यांनी घरी दररोज करावी अशी अपेक्षा असते.



### वर्षारंभ व वर्षान्त उपासना

ज्ञान प्रबोधिनीचे प्रत्येक नवे वर्ष नवनवी आह्वाने पेलण्याचे असते. विद्यार्थी अशा वर्षाची सुरुवात संकल्पयुक्त उपासना करून करतात, तर वर्षान्त उपासनेत वर्षभरातील यशापयशाचा आढावा घेतात.



पूर्वीच्या उपनयन संस्काराचे
आधुनिक रूप म्हणजेच विद्याव्रत संस्कार
इयत्ता आठवीतील सर्व मुलामुलींसाठी हा
संस्कार केला जातो.

व्यक्तिमत्त्व विकास,
शारीरिक विकसन,
मानसिक विकसन,
बौद्धिक विकसन,
सामाजिक जाणीव,
आत्मिक विकसन,
राष्ट्र अर्चना





व्यक्तिमत्त्व विकसनाच्या
दिशा दाखविणारी
एक व्याख्यानमाला
आयोजित केली जाते.
त्यानंतर विद्यार्थी
आई-वडील, गुरुजन व
ज्येष्ठ अभ्यागतांच्या
उपस्थितीत
विद्याव्रताचा स्वीकार करतात.

## दीक्षाग्रहण अथवा विद्याव्रत संस्कार

# शारीरिक कौशल्ये

## काया ही पंढरी

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण विचारात बौद्धिक विकासाइतकेच शारीरिक विकासालाही महत्त्व आहे. ज्या शरीराने आयुष्यभर काम करायचे ते तंदुरुस्त राहण्यासाठी विद्यार्थिकाळापासून प्रयत्न केले पाहिजेत. शाळेतील पुस्तकी शिक्षणानंतर संध्याकाळी दीड तास शारीरिक शिक्षण दिले जाते.







दलांवर विद्यार्थ्यांना संचलन, सूर्यनमस्कार, योगासने, मल्लखांब, पोहणे, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाते.

**दैनंदिन दले**

युवक-युवती विभागांमार्फत चालविली जाणारी सायंकालीन क्रीडादले हा प्रबोधिनीचा गाभा आहे.

# क्रीडा शिबिरे

**कणखर शरीर व मन ही प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांची भूषणे आहेत.**

स्वत:च्या शारीरिक क्षमतांचा शोध लागणे हेही एक शिक्षणच आहे.

हिवाळ्यात निवासी/अर्धनिवासी क्रीडा शिबिरे योजली जातात. शिबिरांतून विद्यार्थ्यांकडून विविध व्यायाम प्रकार करवून घेतले जातात.













# साहस सहली - शिबिरे

मैलोन्‌मैल पाण्याशिवाय वाट तुडविणे, अंधाऱ्या रात्री गडकोट सर करणे यातून शरीर टणक व मन निर्भय बनते. याबरोबरच सह्याद्रीच्या अंगाखांद्यांवर घडलेल्या इतिहासातून स्फूर्ती मिळते.

# नेतृत्वगुण विकसन

## जन सुसंघटनार्थ विणावे

समाजाचा विकास व्हायचा असेल तर या समाजाच्या प्रश्नांचा वेध घेणारे, त्या प्रश्नांना थेट भिडणारे आणि त्या प्रश्नांची उकल करत त्यांना योग्य उत्तरे शोधणारे नेतृत्व येथे निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी नेतृत्वगुणांचा विकास व्हावयास हवा.

कौशल्ये-

कल्पकता, प्रतिभाशाली लेखन,
कल्पक समस्या परिहार
स्व-नियोजन कौशल्य,
नियोजन कौशल्य,
संवाद कौशल्य,
स्वयंअध्ययन,
गट बांधणी,
अग्रणी योजना.



'व्यक्ती-व्यक्ती जमवून भवती कार्य करणे पुरुषार्थी' असे सुसंघटित कार्य करायचे असेल तर संघटनेचे शास्त्र शिकायला लागते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत या शास्त्राच्या काही पैलूंचा मुलांना परिचय करून दिला जातो. यातून विद्यार्थ्यांना नियोजन कौशल्ये, गटात काम करण्याची कौशल्ये यांसारख्या कौशल्यांची ओळख होते. संघटनेत काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वृत्तीची घडण होते.





## नेतृत्वगुण विकसन योजना :

विद्यार्थी 'अग्रणी' म्हणून काम करीत असताना नेतृत्वाच्या काही पैलूंचा अनुभव घेतात.







दिलेले उद्दिष्ट जोडीने अथवा गटाने पूर्ण करणे यासाठी आवश्यक ती साधने मिळवावी लागतात, नियोजन करावे लागते, इतरांचे सहकार्य मिळवावे लागते. उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यूहरचना करावी लागते आणि दिलेल्या वेळात उद्दिष्ट गाठावे लागते, त्यासाठी कधी धोकाही पत्करावा लागतो. सामूहिक बुद्धिमत्तेचा उपयोग करावा लागतो.

## जोडीकार्य-गटकार्य





## नेतृत्वगुण विकसन





## मूल्यमापन

साप्ताहिक चाचण्या, वर्गचाचण्या, प्रात्यक्षिक कार्य, गृहकार्य, प्रकल्प यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे वर्षभर निरंतर मूल्यमापन केले जाते. त्याचबरोबर सत्रान्त परीक्षा व वार्षिक परीक्षा अशा दोन मोठ्या परीक्षा असतात.
विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेताना वर्षभरातील कामाचा विचार होतो.







## सहनिवास

फक्त मुलांसाठी मर्यादित संख्येचे वसतिगृह चालविले जाते.



मुलांसाठी पांढरी सुरवार, गुलाबी झब्बा व पांढरी गांधी टोपी,
मुलींसाठी पांढरी सलवार, निळा कुडता व पांढरी ओढणी...
...असा भारतीय गणवेश.





## गणवेश

गणवेश दर शनिवारी व विशेष प्रसंगी घालायचा असतो.



## प्रवेश प्रक्रिया

इयत्ता पाचवीमध्ये मुलामुलींना प्रवेश दिला जातो. त्यासाठी मानसशास्त्रीय चाचणी घेतली जाते. या चाचणीसाठी इयत्ता चौथीतील मराठी अथवा इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी बसू शकतात.

## संलग्नता

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला दिल्लीच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (CBSE) संलग्न इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतची शाळा आहे.

## पालक-शिक्षक संघ

प्रशालेचा पालक-शिक्षक संघ अतिशय सशक्त व कार्यक्षम असून विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीसाठी आवश्यक विचारांची देवाण-घेवाण दर दोन महिन्यांनी होणाऱ्या पालक-शिक्षक संघाच्या बैठकीत चालू असते.



## माध्यम

माध्यम भाषा म्हणून इंग्रजीचा उपयोग केला जातो. मात्र शालेय सांस्कृतिक वातावरण जाणीवपूर्वक मराठीच ठेवले आहे.



## ग्रंथालय

६०,००० पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, आंतरजालाने जोडलेले संगणक व अभ्यासिका असे मुक्तद्वार ग्रंथालय !



## भाषा कक्ष

विविध भाषा शिकण्यासाठी सुलभ व्हावे म्हणून भाषा प्रयोगशाळेची रचना केली आहे.



## संगणक कक्ष

विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र, सुसज्ज अशी संगणक प्रयोगशाळा उपलब्ध आहे.



## विज्ञान प्रयोगशाळा

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या तीनही विषयांसाठी आधुनिक उपकरणांनी युक्त स्वतंत्र प्रयोगशाळा आहेत.

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
दूरभाष क्र.: (०२०) २४२०७०००, २४२०७१२१. फॅक्स : २४४९१८०६
Website- http://prashala.jnanaprabodhini.org email: prashala@jnanaprabodhini.org



अध्यापक कक्ष

वेळ :
- सकाळी ९.४५ ते सायं ७.०० (सोमवार ते शुक्रवार)
- सकाळी ९.४५ ते सायं ५.३० वर्गातील उपक्रम
- सकाळी ७.२० ते दुपारी २.०० (शनिवार)
- सायं.५.४५ ते सायं.७.०० मैदानावरील उपक्रम

सत्रे- जून ते ऑक्टोबर व नोव्हेंबर ते एप्रिल

# मान्यवरांच्या भेटी....



सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ प्रा. जयंतराव नारळीकर 'विज्ञान दिना' निमित्ताने विद्यार्थ्यांना पारितोषिके देताना



प्रख्यात उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर, श्रीमती यमूताई किर्लोस्कर व श्री. एस.एम.जोशी विज्ञान प्रकल्प पाहताना



प्रबोधिनीचे पहिले अध्यक्ष उद्योगपती आप्पासाहेब कोटिभास्कर



तत्कालीन पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांसह तर्कतीर्थ लक्ष्मणराव जोशी व श्रीमती प्रेमाताई कंटक



महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मा.श्री.विनोदजी तावडे यांची प्रशालेस भेट



तत्कालीन मनुष्यबळ विकास मंत्री श्री. पी.व्ही.नरसिंहराव यांची प्रबोधिनीस भेट



वास्तूवरील 'कलश स्थापनेच्या' सुवर्णक्षणी रामकृष्ण संघाचे स्वामी आत्मानंद व स्वामी भौमानंद



प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांनी चालविलेल्या संजीवन रुग्णालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी



गोव्याचे पहिले मुख्यमंत्री व प्रबोधिनीचे उपाध्यक्ष मा. श्री. दयानंद बांदोडकर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना




पंजाब शांतियात्रेनंतर मा. राष्ट्रपती श्री.ग्यानी झैलसिंग प्रबोधकांना मार्गदर्शन करताना...

# ज्ञान प्रबोधिनी

## ‘समाज संस्थापनेसाठी नेतृत्व विकसन’

- विविध सामाजिक व आर्थिक स्तरांतील बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंची निश्चिती व मापन
- प्रेरणा, प्रतिभा, गतिवाचन, निर्णयक्षमता तसेच सामाजिक जाणीव, गटकार्य व शालेय वातावरण यांवर संशोधन
- भारतीय प्राच्यविद्या संशोधन

### संशोधन




- देशप्रश्न सोडविण्यासाठी चारित्र्य-संपन्न व सक्षम नेतृत्वाची जडणघडण
- स्त्री शक्ती प्रबोधन
- नदीचे खोरे हा घटक मानून ग्रामीण विकासाचे बहुविध उपक्रम

### ग्रामविकास



- अनौपचारिक शिक्षणाची समाजाभिमुख चळवळ
- गुरुकुल पद्धतीचे शहरात व ग्रामीण परिसरात प्रयोग
- ‘मनुष्यघडणीचे शिक्षण’ या स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेचा क्रमिक शिक्षणाला जोडलेला पथदर्शक प्रयोग

### शिक्षण



- रोगप्रतिबंधक उपायांची जाणीवजागृती
- क्रीडाकुल संकल्पनेद्वारा स्पर्धात्मक खेळांचा प्रसार
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व जिव्हाळ्याचे मानवी संबंध यांवर आधारित रुग्णालये, आयुर्वेद, योग, मानसोपचार इ. चा एकात्मिक वापर

### आरोग्य



- निवडक संस्कारविधींना कालोचित व सार्थ रूप देणाऱ्या पुस्तिकांचे प्रकाशन
- सर्व जातिधर्मांतील स्त्री-पुरुषांना पौरोहित्याचे प्रशिक्षण
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी विभिन्न विचारसरणींमध्ये पूल बांधण्याचे प्रयत्न.

### एकात्मता




मुख्य केंद्रे - पुणे, निगडी, सोलापूर   उपकेंद्रे - शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे, हराळी, शिरवळ

विस्तार केंद्रे - अंबाजोगाई, बोरीवली, डोंबिवली, सांगली.

मुख्य कार्यालय - ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००, २४२०७१२१ फॅक्स : २४४९१८०६, e-mail : prashala@jnanaprabodhini.org